अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र४/2206
दिनांक :- 07/07/2020

## -: कार्यालयीन परिपत्रक:-

विषय :- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील "वरिष्ठ लिपिक, वर्ग-३" पदावरील सेवकांची सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ :- १) अति. महापालिका आयुक्त (इ) कार्यालय, जा.क्र.अतिमआ(इ)/साप्र/१६५७ दि.१०/०६/२०१९.

२) अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यलय, जा.क्र.अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र-४/६८१३ दिनांक १२/१२/२०१९.

३) महापालिका आयुक्त कार्यलय, जा.क्र. मआ/साप्र/आस्था/प्र-७/४०२६ दिनांक २७/०८/२०१९.

४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११

५) मा. अति. महापालिका आयुक्त (ज), ठराव क्र. 9/934 दि. 07/07/२०२०.

संदर्भ क्र. १ चे आदेशातील निर्देश विचारात घेऊन पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील लेखनिकी संवर्गातील "वरिष्ठ लिपिक, वर्ग-३" या पदावरील सेवकांची दि.०१/०१/२०१९ दि.३१/१२/२०१९ अखेर प्रारूप सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत करणेसाठी प्रसृत करून अंतिम करावयाची आहे. त्यानुषंगाने खालील प्रमाणे सूचित करण्यात येत आहे,

१) पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील लेखनिकी संवर्गातील "वरिष्ठ लिपिक" या पदावरील सेवकांची दि.३१/१२/२०१८ अखेर सेवाज्येष्ठता यादी संदर्भ क्र. २ अन्वये अंतिम प्रसिद्ध केलेली आहे. दि.३१/१२/२०१८ अखेर "वरिष्ठ लिपिक वर्ग-३" या पदावर एकूण २३२ सेवक कार्यरत होते या २३२ सेवकांच्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीस मा. अति. महापालिका आयुक्त (ज) यांची ठराव क्र.१/६७४ दि.१२/१२/२०१९ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

२) त्यानंतर पुणे महानगरपालिका हद्दीत लगतचे ११ ग्रामपंचायतींचे पुणे महानगरपालिकेत समावेशन केलेले आहे. ग्रामपंचायतीकडील "वरिष्ठ लिपिक" सेवकांना संदर्भ क्र. ३ अन्वये पुणे महानगरपालिका आस्थापनेवर नियुक्ती आदेश दिलेले आहेत, या आदेशातील अट क्र. ७ नुसार समाविष्ठ ग्रामपंचायतीकडील "वरिष्ठ लिपिक" सेवकांची प्रारूप सेवाज्येष्ठता यादी या कार्यालयीन परिपत्रकासोबत प्रसिद्धीस दिलेली आहे.

३) संदर्भ क्र. ४ अन्वये मे. शासनाने दिलेले निर्देशानुसार आधीच्या वर्षी प्रसिद्ध झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासूची पुढील वर्षी पुन्हा नव्याने तात्पुरती (provisional) ज्येष्ठतासूची तयार करताना विचारात घेतलेली नसल्याने प्रसिद्ध केलेली नाही. केवळ त्यानंतरचे वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा, वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली तात्पुरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची प्रसिद्ध केलेली आहे.

४) दि.३१/१२/२०१८ अखेर "वरिष्ठ लिपिक वर्ग-३" वर्गाची अंतिम यादी प्रसिद्ध केल्यानंतर आज दिनांक अखेर दरम्यानच्या कालावधीत "वरिष्ठ लिपिक, वर्ग-३" पदावरील कार्यरत सेवकांचे शैक्षणिक अर्हतेत वाढ व इतर वैयक्तिक माहितीमध्ये बदल झालेला असल्यास या बदल झालेल्या नोंदी अद्ययावत करणेस प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांचेकडे आवश्यक कागदपत्रांचे स्वसाक्षांकित प्रतींसह लेखी स्वरूपात अर्ज सादर करावा.

५) या परिपत्रका सोबत प्रसृत केलेल्या यादीतील ग्रामपंचायत अस्थापानेवरून समायोजित केलेल्या सेवकांच्या सेवाज्येष्ठता विषयक हरकती, शैक्षणिक अर्हता व इतर वैयक्तिक माहितीच्या नोंदी सूधारित करणेची मागणी असल्यास प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांचेकडे आवश्यक कागदपत्रांचे स्वसाक्षांकित प्रतींसह लेखी स्वरूपात अर्ज सादर करावा.

६) उपरोक्त प्रमाणे कागदपत्रांच्या प्रतींसह लेखी अर्ज सादर करण्याची मुदत या कार्यालयीन परिपत्रकाचे दिनांकापासून १५ दिवस राहील.

तरी, संबंधित खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी यांनी या कार्यालय परिपत्रकाचे अनुषंगाने "वरिष्ठ लिपिक" या पदावरील त्यांचे नियंत्रणाखालील सेवकांना त्वरित अवगत करावे व त्याबाबत स्वाक्षरी घेणेची जरूर ती पुढील तजवीज करावी.

(रुबल अग्रवाल)
अति. महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

| पुणे महानगरपालिका "वरिष्ठ लिपिक" (वर्ग - ३) प्रारूप सेवाज्येष्ठता यादी. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शे.मान्य जागा - ४८६ भरलेल्या जागा - २१६ रिक्त जागा - २७० | | | | | | | दि.३१/१२/२०१९ अखेर | | | | |
| अ.क्र | श्री/ श्रीमती | सेवकाचे नाव | नेमणूकीचा प्रवर्ग | जातीचा प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | हायर डिपार्टमेंटल/विभागीय परिक्षा पास होय/नाही | जन्म दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | या पदावरील नेमणुकीचा दिनांक | नियुक्तीचा मार्ग | शेरा / स्वाक्षरी |
| दि.३१/१२/२०१८ अखेर अ.क्र.२३२ पर्यंत "वरिष्ठ लिपिक" सेवाज्येष्ठता यादी अंतिम करणेत आलेली आहे त्यानंतर पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये समावेशन झालेल्या ग्रामपंचायत आस्थापनेवरील वरिष्ठ लिपिक सेवकांचा समावेश केलेला आहे. | | | | | | | | | | | |
| २३३ | श्री | जितेंद्र दगडू सरोदे | अजा | अजा | | | ०१/०२/१९७३ | ३१/०१/२०३१ | ०४/१०/२०१७ | ग्रामपंचायतीकडून समावेशन | |
| २३४ | श्री | सचिन सुरेश घुले | खुला | खुला | | | ०१/०६/१९७६ | ३१/०५/२०३४ | ०४/१०/२०१७ | ग्रामपंचायतीकडून समावेशन | |
| २३५ | श्री | अजय दत्तात्रय रवळे | खुला | इमाव | | | ३०/०१/१९७७ | ३१/०१/२०३५ | ०४/१०/२०१७ | ग्रामपंचायतीकडून समावेशन | |
| २३६ | श्री | बळीराम अंबादास झोंबाडे | अजा | अजा | | | ०१/०६/१९८२ | ३१/०५/२०४० | ०४/१०/२०१७ | ग्रामपंचायतीकडून समावेशन | |
| २३७ | श्री | दत्तात्रय अंकुश लोंढे | अजा | अजा | | | २५/११/१९८२ | ३०/११/२०४० | ०४/१०/२०१७ | ग्रामपंचायतीकडून समावेशन | |
| २३८ | श्री | निलेश वसंत पवार | खुला | खुला | | | २९/०६/१९८५ | ३०/०६/२०४३ | ०४/१०/२०१७ | ग्रामपंचायतीकडून समावेशन | |
| २३९ | श्री | शैलेंद्र सयाजी सोनावणे | अजा | अजा | | | १०/११/१९८९ | ३०/११/२०४७ | ०४/१०/२०१७ | ग्रामपंचायतीकडून समावेशन | |

प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग
पुणे महानगरपालिका